ॲन इव्हिनिंग इन पॅरिस





ॲन इव्हिनिंग इन पॅरिसमध्ये शर्मिला टागोर आणि शम्मी कपूरची रोमॅंटिक अदा

परदेशात चित्रपट बनवण्यात माहिर असलेल्या शक्ती सामंतांनी या चित्रपटासाठी आपली सगळी शक्ती पणाला लावली होती...

□ इसाक मुजावर

परदेशी लोकेशनवर चित्रित केलेला पहिला हिंदी चित्रपट १९५४ चा एस. के. ओझांचा *नाज*. लंडन, रोम व कैरोच्या लोकेशनवर चित्रीकरणाचा नवा प्रयोग करूनही तो एकदम फ्लॉप ठरला. त्यानंतर जवळजवळ सहा वर्षे कोणाही निर्मात्याने परदेशात चित्रीकरण करण्याचं धाडस केलं नाही. *नाज*नंतर परदेशात चित्रीत झालेला दुसरा चित्रपट एफ. सी. मेहरांचा *सिंगापूर* आणि तिसरा १९६२चा पाछींचा *हॉंगकॉंग*. *नाज* आणि *हॉंगकॉंग* या दोन्ही चित्रपटांचा नायक अशोककुमार होता. *नाज*च्या आऊट डोअरसाठी तो परदेशात गेला होता. पण *हॉंगकॉंग*साठी मात्र तो परदेशी जाऊ शकला नव्हता. त्यात तो परदेशात म्हणजे *हॉंगकॉंग*ला असल्याचा आभास निर्माण करण्यासाठी बऱ्याच दृश्यं बॅक प्रोजेक्शनच्या तंत्राने करण्यात आली होती.

या तंत्रात प्रोजेक्टरच्या सहाय्याने एखादं दृश्य पडद्यावर प्रोजेक्ट केलं जातं व चित्रपटातील कलावंतांना त्या दृश्यासमोर उभं करून त्यांच्यावरील दृश्याचं चित्रण करण्यात येतं. हे चित्रण इनडोअर असूनही बॅक प्रोजेक्शनमुळे आऊट डोअरचा इफेक्ट निर्माण होतो.



*नाज*प्रमाणे *सिंगापूर, हॉंगकॉंग* एकदम फ्लॉप झाले नाहीत. ॲव्हरेज हिंदी चित्रपटांच यश त्यांना लाभलं. पण त्यांनी परदेशी शहरांची नावं हिंदी चित्रपटांच्या शीर्षकात आणण्याचा नवा ट्रेंड आणला. त्याआधी *शहर बॉम्बे, बॉम्बे कॉलिंग, बॉम्बे की बिल्ली, बॉम्बे मेल, नई दिल्ली, दिल्ली का ठग, दिल्ली एक्सप्रेस, कलकत्ता आफ्टर मिडनाईट*सारख्या चित्रपटांची निर्मिती झाली. *सिंगापूर, हॉंगकॉंग*नंतर *लव्ह इन टोकियो, लव्ह इन कॅनडा, नाईट इन लंडन*सारख्या चित्रपट बनले.

१९६७ला या परंपरेतलाच एक चित्रपट *ॲन इव्हिनिंग इन पॅरिस* आला. शक्ती सामंत त्याचे निर्माता-दिग्दर्शक होते. एफ. सी. मेहरांच्या *सिंगापूरचं* दिग्दर्शन त्यांनीच केलं होतं. अशोककुमारचा हात धरून त्यांनी दिग्दर्शनाची वाटचाल सुरू केली. अशोककुमारने नायकाची भूमिका केलेले चित्रपट त्यांच्या रुपेरी जीवनाचं पहिलं पर्व होतं तर शम्मी कपूरने नायकाची भूमिका केलेले चित्रपट दुसरं पर्व. *सिंगापूरपासून* हे सुरू झालेलं हे पर्व *चायना टाऊन, काश्मीर की कली* या चित्रपटांची वाटचाल करत *ॲन इव्हिनिंग इन पॅरिसमध्ये* ते पॅरिसला पोहोचले. तरीही अशोककुमारने नायकाची भूमिका केलेल्या त्यांच्या चित्रपटांचा चेहरा काही तेव्हा बदलला नव्हता. शम्मी कपूरची नायकाची भूमिका असलेला त्यांचा चित्रपट तो जुनाच चेहरा घेऊन पडद्यावर येत होता. शम्मी कपूरचा *ॲन इव्हिनिंग इन पॅरिस* अशोककुमारच्या *हावडा ब्रिजला* एक नवा व रंगीत चेहरा देणारा त्यांचा एक चित्रपट होता. *हावडा ब्रिजमध्ये* उंचावरील ॲक्शन दृश्यांचा एक नवा ट्रेंड त्यांनी आपल्या चित्रपटात आणला होता. *ॲन इव्हिनिंग इन पॅरिसमध्ये* हा ट्रेंड त्यांनी आणखी उंचावर नेऊन पॅरिसच्या एफिल टॉवरवर पोहचवला. *ॲन इव्हिनिंग इन पॅरिसच्या* आधी *नाजमध्ये* एफिल टॉवर दिसला आणि त्यानंतर राज कपूरच्या *संगममध्ये* देखील. *संगममध्ये* नायक-नायिकेची प्रणयदृश्यं एफिल टॉवरवर चित्रित करून राज कपूरने एफिल टॉवरला रोमँटिक बनवलं होतं. शक्ती सामंतानी *ॲन इव्हिनिंग इन पॅरिसमध्ये* या एफिल टॉवरला हाणामारीचा अड्डा बनवून टाकला.


१९५७च्या *तुमसा नही देखापासून* शम्मी कपूरच्या बंडखोर नायकाचं एक युग सुरू झालं. या युगात तो नायक असलेल्या चित्रपटातून नायिकेची गाणी हळूहळू कमी होऊ लागली होती. *ॲन इव्हिनिंग इन पॅरिस* याला अपवाद नव्हता. यातल्या एकूण सात गाण्यांपैकी 'अजी ऐसा मोका फिर कहा मिलेगा...', 'ॲन इव्हिनिंग इन पॅरिस...', 'दिवाने का नाम तो पुछो...' 'होगा तुमसे कल भी सामना...', 'अकेले अकेले कहा जा रहे हो...', 'मेरा दिल है मेरा...' ही पाच गाणी रफीने गायली होती. 'तुम से कल भी सामना...' ला रफीबरोबर कोरसचा आवाज होता. 'रात के हम सफर...' गाण्यात आशाबाईंनी रफीला साथ दिली होती. 'ओ जानेमन...' मध्ये रफीबरोबर अधूनमधून शर्मिला टागोरचा आवाज होता. त्यामुळे शम्मी कपूरची भूमिका पुरती संगीतमय बनून गेली होती. ही संगीतमयता शक्ती सामंतांच्या चित्रपटातील अशोककुमारच्या नायकाला मात्र नसायची.

शर्मिला टागोर या चित्रपटाची नायिका होती. या चित्रपटात तिचा डबल रोल होता. हिंदीत येण्यापूर्वी ती बंगाली चित्रपटातील एक लोकप्रिय तारका होती. शक्ती सामंतानी आपल्या *काश्मीर की कलीमधून* तिला हिंदीत आणलं आणि पुढे *ॲन इव्हिनिंग इन पॅरिसमध्ये* तिला बिकिनी गर्लचा एक नवा चेहरा दिला. तोपर्यंत आपल्या चित्रपटातील नायिका कधीतरी बेदिंग सूटमध्ये पडद्यावर दिसायची. १९३८चा मा. विनायक यांच्या *ब्रह्मचारीची* नायिका मीनाक्षी शिरोडकर बेदिंग सूट परिधान करून पडद्यावर आली म्हणून तिच्या विरुद्ध तेव्हा सर्वत्र नाराजीचं एक वादळ निर्माण झालं होतं. *ॲन इव्हिनिंग इन पॅरिसमध्ये* शर्मिला बिकिनीत पडद्यावर आली तेव्हा तिच्या विरोधात देखील हे असंच वादळ निर्माण झालं होतं. बिकिनीतील तिचं एक छायाचित्र फिल्मफेअरच्या मुखपृष्ठावर प्रसिद्ध झालं होतं. ते पाहून काहींची माथी इतकी भडकली होती की त्यांनी पेपर स्टॉलवरच्या फिल्मफेअरच्या अंकांची होळी केली होती. अनेक चित्रतारका आपल्या चेहऱ्याला नवा लूक देण्यासाठी केसांचा विग चढवतात. हा विग शर्मिला टागोरनेच *ॲन इव्हिनिंग इन पॅरिस* या चित्रपटातील आपल्या भूमिकेतून हिंदी चित्रपटात सर्वात प्रथम आणला त्याचप्रमाणे कॉन्टॅक्ट लेन्सचा उपयोगदेखील तिनेच सर्वप्रथम सुरू केला. या चित्रपटातील तिच्या डबल रोलपैकी एक रोल क्लब डान्सरचा होता. या रोलला नवा लूक देण्यासाठी या चित्रपटात तिने आपल्या डोळ्यांवर कॉन्टॅक्ट लेन्स लावले होते. तिची प्रतिमा तशी नृत्यतारकेची नव्हती. तरीही क्लब डान्सरच्या भूमिकेत दोन नृत्यगीतं तिच्यावर चित्रित करण्यात आली होती. त्यातील 'ले जा, ले जा, ले जा, मेरा दिल...' शारदाने गायलं होतं तर 'इदी जुबी जुलेम्बु...' हे नृत्यगीत आशाबाईंनी. या गाण्यातील जुलेम्बू हा शब्द फ्रेंच भाषेतला आहे. त्याचा अर्थ 'आय लव्ह यू'. या चित्रपटाच्या कथेची पार्श्वभूमी फ्रान्सची होती. म्हणून गीतकार हसरतनी एका गाण्यात जुलेम्बू हा शब्द मुद्दाम वापरला. हसरत यांच्याबरोबर शैलेंद्रदेखील या चित्रपटाचे गीतकार होते. *ॲन इव्हिनिंग इन पॅरिसपूर्वी* किशोर साहूंच्या बीना रॉय अभिनित *काली घटामध्ये* एका गाण्यात जुलेम्बू हा शब्द वापरला होता. हे गाणं शैलेंद्रनी लिहिलं होतं.

ॲन इव्हिनिंग इन पॅरिसमध्ये शम्मी कपूर, शर्मिला टागोर यांच्याबरोबर राजेंद्रनाथ, सरिता ढिल्लों, प्राण, मदनपुरी, के. एन.सिंग, शेट्टी, सुरेंद्रनाथ, डेव्हीड यांच्या प्रमुख भूमिका होत्या.



संगममध्ये राज- वैजयंती: हनीमून इन पॅरिस



शहनाईमध्ये विश्वजित-राजश्री आणि *काश्मीर की कलीमध्ये* शर्मिला-शम्मी: बॉलीवूडमध्ये विदेशी लोकेशन्सच्या आधी काश्मीरला प्राधान्य होतं.

